**शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजीत करण्याबाबत.**

**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक .जमीन०५/२०११/प्र.क्र ९०/ज-१**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक : २७ जुलै २०११.**

**वाचा :** १) महाराष्ट्र सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१ मधील नियम क्र.६

२) महाराष्ट्र शासन अधिसूचना दि.११ ऑक्टोबर, २००० महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमिनीची विल्हेवाट लावणे) (सुधारणा) नियम २०००

३) शासन परिपत्रक क्रमांक जमीन-१०/२००५/प्र.क्र.३७/ज-१, दि.७.४.२००५

४) शासन निर्णय क्रमांक जमीन-१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१, दि.७.३.२००६

**प्रस्तावना :**

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.एलएनडी १०७१/१८३७३६/ए-II, दि.९.९.१९७१ व दि.२५.२.१९७२ अन्वये राज्य शासनाच्या / केंद्र शासनाच्या विविध विभागांना / उपक्रमांना आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना होते. मात्र तद्नंतर यामध्ये पुनर्विलोकन होऊन शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र.जमीन १०/२००५/प्र.क्र.३७/ज-१, दि.७.४.२००५ अन्वये कुठल्याही प्रयोजनाकरिता कोणत्याही प्रकरणात (शासनाचे इतर विभागासहीत) शासनाच्या पुर्व परवानगी शिवाय आगावू ताबा न देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर शासन निर्णय क्रमांक जमीन/१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१, दि.७.३.२००६ अन्वये उपरोक्त सुचना रद्द करण्यात येऊन काही अपवादात्मक प्रकरणात नगरपालिका / नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याबाबतचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित करण्यात आले आहेत.

२. तद्नंतर जमीन उपलब्धतेची तातडी व निकड लक्षात घेऊन अन्य अपवादात्मक प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्याचे आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. उदा- पोलीस स्टेशन, कोस्ट गार्ड, सामाजिक न्याय विभागाच्या योजना, आदिवासी विकास विभागाच्या योजना, R-Seti योजना, पर्यटन विकासाच्या योजना इत्यादी योजना कार्यक्रमासाठी आवश्यक शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याचे अधिकार वेळोवेळी स्वतंत्र आदेशान्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

मात्र शिक्षण (शासकीय व जिल्हा परिषद शाळा, महाविद्यालय) आरोग्य (शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रे, कुटीर रुग्णालय), सिंचन (सिंचन तलाव), प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक शासकीय जमीन इत्यादी सारख्या अत्यावश्यक व पायाभूत सेवांसाठी तसेच विकास कामांसाठी आवश्यक जागांचा

आगावू ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले नाहीत. तसेच अत्यंत अपवादात्मक बाब वगळता महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, या शासकीय प्रकल्पांच्या प्रयोजनाकरिता अर्थसंकल्पात केलेल्या तरतूदीचा वेळेत वापर न होता ती अखर्चीत पडून राहते किंवा परत करावी लागते. तसेच, ही कामे वेळेत पूर्ण होण्यात अडचणी निर्माण होतात पर्यायाने अंदाजपत्रकात सुध्दा वाढ होते. म्हणून वरील प्रयोजनाकरीता शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्तांना देण्याची मागणी क्षेत्रीय स्तरावरून करण्यात येत होती. सबब, या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.-

**<u>शासन निर्णय :</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून अन्य नगरपालिका/ महानगरपालिका क्षेत्रात तसेच ग्रामिण क्षेत्रात विकास आराखडयात आरक्षित सार्वजनिक सुविधा (Public Conveniece) व सार्वजनिक प्रयोजना (Public pupose) करिता आरक्षित दि.७.३.२००६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद प्रयोजनांसाठी तसेच पुढील प्रयोजनांसाठी म्हणजे शासकीय दवाखाने, शासकीय शाळा/ आश्रम शाळा, शासकीय महाविद्यालय, केंद्रीय विद्यालय, शासकीय वसतीगृह, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन, पाणी पुरवठा योजना सिंचन प्रकल्प,(तलाव), शासकीय कार्यालयांच्या इमारती तथा जिल्हा परिषदमार्फत राबविण्यात असलेल्या विविध लोकोपयोगी योजना/ कार्यक्रम / प्रकल्प इत्यादी कामांकरिता निर्बांध्यरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनीचा आगावू ताबा राज्य / केंद्र शासनाच्या विविध विभागांना व त्यांच्या योजनांसाठी जमिनीच्या किमान गरजेनुसार (Bonafide area requirement) देण्याचे अधिकार पुढील अटीशर्तीनुसार अनुक्रमे जिल्हाधिकारी १ हेक्टर पर्यंत व १ हेक्टर पेक्षा जास्त मात्र ५ हेक्टर मर्यादेपर्यंत विभागीय आयुक्त यांना प्रत्यायोजित करण्यात येत आहेत. मात्र, सिंचनप्रकल्प (तलाव) व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक शासकीय जमिनीचा या प्रयोजनांकरिता आगावू ताबा देण्याचे पूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

१) शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्यापूर्वी प्रचलित धोरणानुसार संबंधित प्रयोजनासाठी जमीन मंजूरीकरिता आकारावयाची पूर्ण किंमत वसूल करण्यावी यावी.

२) जमिनीची मागणी शासकीय प्रकल्पासाठी, प्रयोजनासाठीच असल्याची व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची/ विभागाची प्रशासकीय मान्यता आहे याची खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत खाजगी योजना, कार्यक्रम, प्रकल्पासाठी आगावू ताबा देवू नये.

३) जमिनीचे आरक्षणाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी खात्री करुन तद्नंतर ताबा द्यावा.

४) जिल्हाधिकाऱ्यांनी ताबा देण्यापूर्वी त्यांना आवश्यक वाटतील अशा अटी व शासनाच्या अन्य अटी/शर्ती मान्य आहेत, अशा स्वरुपाचे लेखी हमीपत्र घ्यावे.

५) जमिनीचा आगावू ताबा दिल्यानंतर जमिनीचे संरक्षण करणे, देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

२. शासकीय जमिनीचा आगावू ताबा देताना मागणी केलेल्या प्रयोजनासाठी जागेची खरीखुरी आवश्यकता (Bonafide area requirement) विचारात घेउन किमान आवश्यक जागेचा ताबा द्यावा भविष्यातील आवश्यक्तेसाठी किंवा विस्तारासांठी जास्त जमिनीचा ताबा देवू नये. तातडीच्या शासकीय प्रकल्पासाठी, प्रयोजनांसाठी ,प्रकरणांचे गांभीर्य व तातडी विचारात घेवून गुणवत्तेवर आगावू ताबा देण्याबाबत निर्णय घ्यावा. **अशासकीय / खाजगी / धर्मादाय संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या योजना / प्रयोजन / उपक्रमांसाठी तसेच शासकीय महामंडळे व शासनाच्या अंगीकृत उपक्रमांना शासकीय जमिनीचा आगावू ताबा देण्यात येऊ नये.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०११०७२७१७२७५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(राजेंद्र सुर्वे )
सहसचिव
महसूल व वन विभाग

**प्रत:-** मा.मुख्य सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
सर्व मंत्रालयीन विभागांचे सचिव
सर्व विभागीय आयुक्त
जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमि अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वियं सहाय्यक.
प्रधान सचिव (वने) यांचे स्विय सहाय्यक.
सर्व सह सचिव/उपसचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई-३२
ज समूहातील सर्व कार्यासन अधिकारी/अवर सचिव
निवडनस्ती ज-१ कार्यासन

--------